
2018-19



# क्रांतीपर्व

## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल




प्रा. अमर जावळे

प्रा. भूषण काटे - पाटील


LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS

Scanned by CamScanner

# क्रांतीपर्व

## लोकशाहीप्रधान देशाची वाटचाल

**प्रा. अमर वसंत जावळे**

समन्वयक,सरदार पटेल अध्ययन व संशोधन केंद्र.

**प्रा भूषण ज्ञानदेव पाटील**

समन्वयक, इंदिरा गांधी अध्ययन व संशोधन केंद्र.

**LAXMI BOOK PUBLICATION**

**2018**

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | पंतप्रधान इंदिराजी: आणीबाणी व वृत्तपत्रावरील सेन्सोरशिप | १ |
| २ | सरदार वल्लभभाई पटेल आणि राजस्थान | १२ |
| ३ | इंदिरा पर्वातील राष्ट्रीय आणीबाणी - एक अभ्यास | १६ |
| ४ | स्व.इंदिरा गांधीच्या छत्रछायेतील काही वर्ष | २३ |
| ५ | **संस्थान के विलीनीकरण मे सरदार वल्लभभाई पटेल कि भूमिका** | २८ |
| ६ | **स्व.इंदिराजी गांधी यांच्या कारकीर्दिमधून नेतृत्व विकासाचे धडे** | ३३ |
| ७ | संस्थानिकांच्या विलिनीकरणात सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | ३८ |
| ८ | Vallabhbhai Jhaverbhai Patel and Faizpur Congress १९३६ | ४२ |
| ९ | सरदार वल्लभभाई पटेल : एक उत्तम प्रशासक | ५४ |
| १० | स्वर्गीय इंदिरा गांधी :: एक कणखर महिला नेतृत्व | ५८ |
| ११ | भारतीय राजनिती का चमकता तारा :- इंदिरा गांधी | ६१ |
| १२ | भारताच्या आर्थिक विकासातील इंदिरा गांधीचे योगदान | ६४ |
| १३ | **श्रीमती इंदिरा गांधी यांचे परराष्ट्रीय धोरण व भारतीय सुरक्षा** | ७० |
| १४ | लोह पुरूष आणि लेडी सरदार | ७४ |
| १५ | देशप्रेमी प्रियदर्शनी इंदिरा | ७८ |
| १६ | अखंडीत भारताचे प्रेणेते :- सरदार वल्लभभाई पटेल | ८० |
| १७ | इंदिरा गांधी - एक कार्यकाल नेतृत्व | ८३ |
| १८ | भारतातील ग्रामिण वित्तीय व्यवस्थेत इंदिरागांधी यांचे योगदान | ८४ |
| १९ | इंदीरागांधी समग्र विचार : आधुनिक काळाची गरज | ९१ |
| २० | भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान एक कणखर नेत्या - श्रीमती इंदीरा गांधी | ९५ |
| २१ | आणीबाणी "विरोधकांची" | ९९ |


Scanned by CamScanner

# पंतप्रधान इंदिराजी:
# आणीबाणी व वृत्तपत्रावरील सेन्सोरशिप

**डॉ.प्रशांत सुधाकर देशमुख,**
**इतिहास विभाग प्रमुख, अ.र.भा. गरूड महाविद्यालय, शेदुर्णी.**

भारतात आणीबाणी जून 1875 ला पंतप्रधान इंदिराजींनी लागू केली यावेळी जगात व्यक्ती स्वातंत्र्याला आणि मुलभूत हक्काना सर्वात जास्त महत्व देणा-या अमेरिका लोकशाही स्वातंत्र्याची दोनशेवा स्वातंत्रदिन साजरा करीत होती. यावेळी भारतात व्यक्तीस्वातंत्र्य आणि मुद्रण स्वातंत्र्यास मात्र कठोर बंधनातून जावे लागत होते. 1975 पूर्वी भारतात 1965 च्या भारत-पाकीस्तान युद्धाच्या वेळी 22 दिवस, 1971 च्या बांगलादेश निर्मितीच्या वेळी 15 दिवस बाह्य आणीबाणी लागू करण्यात आली होती. मात्र 1975 जून ला लागू आणीबाणी साडे अठरा महिने(635 दिवस) अंतर्गत आणीबाणी पंतप्रधान इंदिराजींनी लागू केली (25 जून 1975 - 18 मार्च 1977.)

लालबहादूर शास्त्री यांच्या मृत्युनंतर पंतप्रधानपदाची शपथ इंदिराजींनी राष्ट्रपती भवनाच्या अशोक हॉलमध्ये 24 जाने.1966 ला घेतली. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. 1966 ते 1975 या काळात इंदिराजींच्या कार्याचा सर्वोच्च गौरव म्हणजे 1971 चे भारत-पाकिस्तान युध्द व बांगलादेशची निर्मिती सत्तरच्या दशकात इंदिराजींचा धाकटा पुत्र संजय यांनी राजकारणात प्रवेश घेतला. संजय गांधींवर इंदिराजींनी आपल्या कार्याचा भर सोपवायला सुरुवात केली होती. याचवेळी पाकिस्तानशी झालेला संघर्ष आणि 1971 चि बांगलादेशची निर्मिती या घटनांमुळे त्यांची लोकप्रियता, सत्ता व कीर्ती सर्वोच्च शिखरावर होती. सत्ता आणि पक्ष एक हाती असल्ये त्यांना कोणी प्रश्न विचारू शकत नसे. यावेळी संजय गांधी आणि त्यांचे सहकारी सरकारमधील अधिका-यांशी संगनमत करून सत्तेचा वापर करीत असत. या अशा निर्णयात पंतप्रधानांचा निर्णय नसला तरी समाजाला आणि बाह्य शिस्तना हे निर्णय हे पंतप्रधान इंदिराजिंचेच आहेत असे वाटत असे.[1]

याचवेळी अलाहाबाद उच्च न्यायालयाने रायबरेली मतदारसंघातून जिंकलेल्या इंदिराजींची 1971 ची लोकसभा निवड 12 जून 1975 ला रद्द केली. या निर्णयाने 1966 पसुन 540 आठवड्याची अकरा वर्षे अधिराज्य गाजविणारी लोकसभेची द्वारे त्यांना बंद झाली.[2] वृत्तपत्र विरोधी वातावरण पंतप्रधान इंदिराजींच्या विरोधात आणीबाणी लागू होण्यापूर्वीच बनले होते. कारण 1972-74 या काळात विरोधी पक्ष, पंतप्रधानांवर टीका, भ्रष्टाचाराचे आरोप व जनसंघटन वाढलेले होते.1969 ला कॉंग्रेस सिंदिकेत-इंडिकेट मध्ये विभागल्यापासून बड्या उद्योगपतींची मक्तेदरी असनाऱ्याच्या वृत्तपत्रांशी संबंध प्रस्तापित झाले आहेत. असा पंतप्रधानांचा रोख होता. आपल्या



Scanned by CamScanner

शासनाला अशा वृत्तपत्रांचा संपादकांचा पाठिंबा नाही, राष्ट्रीयकरण सारख्या महत्वपूर्ण घटकांना वृत्तपत्र महत्व देत नाही असत त्यांचा रोख होता.[3]

याच वेळी जय प्रकाश नारायणांनी 6 मार्च 1975 व 26 जून 1975 ला विशाल जनसभा घेतल्या. 5 जून 1974 च्या पटना येथील सभेत त्यांनी संपूर्ण क्रांती या शब्दाचा वापर केला. जय प्रकाश नारायणांना 'संपूर्ण क्रांती' अंतर्गत सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, वैचारिक, शैक्षणिक व आध्यात्मिक क्रांती असे सात प्रकार त्यांनी सांगितले.[4] 6 मार्चच्या दिल्लीच्या सभेत एकूण 12 मागण्या केल्या. बिहार-गुजराथमध्ये निवडणुका घ्याव्यात, जीवनावश्यक वस्तूंचे दर कमी करावेत, किमतीत वाढ करू नये, मजुरीची हमी असावी प्रभाची अशा जमीन सुधारणा व्हाव्यात, आर्थिक विषमता दूर व्हावि भूमिहीनांना भूमी आणि मजकुरांना मंजुरी मिळावी, रोजगाराची आवश्यकता नागरिक स्वातंत्र्यहक्क सुलभ व्हावेत, स्वतंत्र पण तटस्थ निवडणुका, मतदानाचे वय 21 वरून 18 करण्यात यावे, लोकपालांची नियुक्ती व्हावी, या त्या मागण्या होत्या.[5]

दि.12 जून च्या कोर्टाच्या निकालानंतर इंदिराजी 17 जून 1975 ला राष्ट्रपती महोदयांना भेटल्या. त्यांनी त्रोटक तीपण त्यांना दिले. याच वेळी विरोधीपाक्षांचे नेतेही राष्ट्रपती महोदयांना भेटले. व त्यांनी दोन मागण्या केल्या. एक म्हणजे संसदेचे पावसाळी अधिवेशन वेळेवर बोलवावे आणि दुसरी मागनी प्रसार माध्यमाचा शासनाद्वारे होणारा गैरवापर थांबवावा. पावसाळी अधिवेशन जुलैच्या मध्यात होते त्याची नीतीस जूनच्या पहिल्या-दुस-या आठवड्यात काढली जाते ती काढण्यात आली नव्हती. याचवेळी 12 जून ला न्यायालयाचा निकाल आला त्यामुळे अधिवेशन होणार नाही घेतले जाणार नाही अशी एक भीती विरोधी पक्षास वाटत होती.[6] 25 जून 1975 ला जयप्रकाश नारायणांनी रामलीला मैदानावर लोकसंघर्ष समितीची सभा घेतली. याच सभेत त्यांनी पोलिसांना आणि लष्कराला सरकारचे बेकायदेशीर आदेश मान्य करू नका असे जाहीर केले. न्यायालयाच्या निर्णयानुसार आम्ही त्यांच्या राजीनाम्याची मागणी करतो यात चुकले काय? या देशांत जयप्रकाश नारायण जर देशद्रोही असेल तर एक हि देशभक्त उरलेला नाही असेच मी म्हणेन असे स्पष्ट केले. रामलीला मैदानावर सभा चालू असतानाच पंतप्रधान इंदिराजींनी राष्ट्रपती फक्रुद्दीन आली अह्माडांची भेट घेतली. त्यांनी गोटक टिपण दिले त्यात नमूद होते की, 'या देशाचे अखंडत्व आणि स्वातंत्र्य धोक्यात आलेले असल्यामुळे सरकारला आणीबाणी घोषित करावी लागत आहे.[7]

आणीबाणी लागू करण्यामागची मुख्य तीन करणे त्यांनी स्पष्ट केली. भारताची सुरक्षा, दायित्व-अखंडत्व आणि लोकतंत्र यास जेपी यांनी लष्करास आणि पोलिसांना उद्देशून केलेले आवाहन, गरीब आणि सुविधाहीन जनतेच्या हितास प्राधान्य आणि भारतास कमजोर आणि अस्थिर करणा-या ताकतींचा आलेला अंदाज, आणीबाणी लागू करण्यामागे कारणांचा लेखा जोखा घेता या मागे 12 जून 1975 चा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल, जय प्रकाशाचे पत्र, राष्ट्रीय समन्वय समितीची स्थापना, तरुण तुर्कांचा (मोहन धारिया, चंद्रशेखर, कृष्णकांत, रामधन आणि लक्ष्मीकांत) यांचा बैठकीवर बहिष्कार, बत क्लबवरील सभा, लोकसंघर्ष समितीची स्थापना इ. प्रमुख करणे होती.[9] आणीबाणी लागू करण्यामागे ज्या तिन्व्याक्तींचा सहभाग होता त्यात सिद्धार्थ शंकर राय, बन्सीलाल आणि संजय गांधी, आर के धवन यांचा सहभाग आदेशांचे पालन करण्यापुरताच



Scanned by CamScanner

होता. यात हरियाणाचे मुख्यमंत्री बन्सीलाल यांची भूमिका ही महत्त्वाचीच होती.[10] रॉय हे सभ्य ग्रुहस्थ होते.ते एक कुशल व चतुर वडील होते.

जयप्रकाश नारायण यांनी लष्कराला व पोलिसांना सरकारविरुद्ध उठाव करण्यास सांगितल्याने देशात नक्कीच अराजक माजेल असे इंदिराजींचे मत होते. सार्वजनिक निवडणुका डिसेंबर 1975 ला घेतल्या जाणार होत्या, याच पार्श्वभूमीवर जयप्रकाश नारायण नागरीक्रांती घडवून आणू पाहत होते. नागरीक्रांतीची तयारी, डिसेंबर 1975 च्या निवडणुका हि पार्श्वभूमी असताना 12 जून 1975 ला 1971 च्या बांगलादेशच्या निर्मितीनंतर दुर्गा अवतार इंदिराजींना ज्याप्रमाणे 1972 च्या निवडणुकीत यश मिळविले, रायबरेलीची निवडणूक जिंकली. या निवडणुकीतील प्रचारादरम्यान घडलेल्या प्रमादाबाबत श्री राज नारायण यांनी दाखल केलेल्या याचीच्या सुनावणीचा निकाल 12 जून 1975 ला लागला.[11] अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात अहवाल इंदिराजींनी दाखल केले. याच काळात इंदिराजींना पाठींबा दर्शविणारे मेळावे कॉंग्रेसने आयोजित केले.अलाहाबादच्या न्यायालयानंतर केवळ 13 दिवसातच देशात आणीबाणी लागू करण्यात आली.[12]

आणीबाणी लागुकारण्यात आली तेव्हा डॉ. फक्रुद्दिन अली अहमद राष्ट्रपती होते. आणीबाणी 20-21 मार्च 1977 ला उठविण्यात आली. त्यापूर्वी 11 फेब्रु. 1977 ला त्याच देहावसान झाल राष्ट्रपती महोदय हे पूर्वी इंदिरा कॉंग्रेसनिष्ठ होते. ते सतत म्हणत 'मी स्वतंत्र निर्णय घेणारा राष्ट्रपती आहे. मी कोणाच्या दबावाला बळी पडणार नाही.[13] त्यांनीच आणीबाणीच्या हुकुमावर स्वाक्षरी केल्याने त्यांचा उल्लेख 'रबर स्टम्प' राष्ट्रपती असा करण्यात येवू लागला. वास्तविक डॉ. फक्रुद्दीन यांची राहणी डामडोलाची, प्रतिष्ठित आणि श्रीमंत कुटुंबातील.पंडित नेहरू यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता.राष्ट्रपती पदावर येईपर्यंत ते इंदिरानिष्ठ कॉंग्रेसचे ते समर्थक होते. राष्ट्रपती महोदयांनी जगप्रसिद्ध केंब्रीज विद्यापीठात कॉमर्स शिक्षण घेतलेले होते. केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री म्हणून काम करताना आपल निर्णय क्षमता आणि प्रशासनिक कौशल्याची प्रचिती त्यांनी वेळोवेळी दिली होती. ते शिक्षणतज्ञ निश्चित नव्हते मात्र स्वाक्षरी करताना प्रस्तावाला मंत्री मान्दालाचीमान्यता आहे काय? याचा विचार सुद्धा त्यांनी केला नाही.[14]

प्रा. धर, शारदा प्रसाद, देवकांत बरुआ, सिद्धार्थ शंकर रे यांच्या उपस्थितीत इंदिराजी पंतप्रधान कार्यालयात आणीबाणीबाबत म्हणाल्या- I Will Inform The Cabinet Tommarow.[15] आणीबाणी 25 जून 1975 ला मध्यरात्री लागू झाली आणि 4 दिवसातच 1 जुलै 1975 ला पंतप्रधान श्रीमती इंदिराजींनी 20 कलमी कार्यक्रमाची योजना घोषित करण्यात आली. यात भुइहिन, अल्पभूधारक, ग्मैन कारागिरांचे कर्ज माफ,घरकुल, मजुरीची रक्कम वाढविणे, आवश्यक वस्तूंची सेवापूर्ती, आकारत 8000 पर्यंत सुट, इत्यादी. याचवेळी संजय गांधीनी आपल्या चारसूत्री कार्यक्रमाची घोषणा केली. हुंडा न घेणे, कुटुंबनियोजन, हम-दो, हमारे-दो, वृक्षलागवड आणि साक्षरता.[16] आणीबाणीच्या काळात 29 वा स्वातंत्र्य दिवस साजरा कराण्यात आला. लाल किल्ल्याकडे जात असताना दि. 15 ऑगस्ट 1975 ला इंदिराजींना बांगलादेशचे राष्ट्रपिता आणि त्यांच्या कुटुंबातील पत्नी, तीन मुलगे, दोन सुना, दोन पुतणे यांची हत्या झाल्याची दुःखद बातमी



Scanned by CamScanner

त्यांना कळाली. बांगलादेशची निर्मिती करणा-या पंतप्रधान इंदिरा दुर्गा चंडीला म्हणून ओळखला जात त्यांच्यावर हा मोठा आघात होता.

आणीबाणी लागू झाल्यानंतर केवळ स्टेट्समन व हिन्दुस्थान टाइम्स ही दोनच वृत्तपत्र दिल्लीतून प्रकाशित होऊ शकली.बाकीची वृत्तपत्र छापलीच गेली नव्हती त्या वृत्तपत्रांचा वीजपुरवठा काढ्यात आला होता. वयोवृद्ध भीमसेन सच्चर यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात नमूद केल की, 'वृत्तपत्र स्वातंत्र्याचे प.नेहरूंनी जे महत्व पतीपादलं होतं आणि आज स्वातंत्र्य धोक्यात आहे. सर्व शक्तीनिशी त्याचं रक्षण करा' असे त्यांनी आवाहन केले.[17] आणीबाणीच्या काळातील वातावरणाबाबत, तुलना करताना बी.एन.टंडन यांनी चाहुल आणीबाणीची यात एक उदाहरण दिले आहे. 20-22 वर्षांपूर्वी (1953-54) मध्ये जस पूर्व बर्लिनमध्ये वाटत होत तस आजकाल देशात वाटत आहे.[18] के. आर. पोतदार आपल्या संपादक आणि संपादकीय मध्ये लिहितात की पत्रकार आणि पत्रकारिता यांची लोकशाहीशी, वृत्तपत्र स्वातंत्र्य, अविष्कार स्वातंत्र्य आदी स्वातंत्र्याशी मुलभूत बांधिलकी असते कारण वृत्तपत्र-पत्रकार यांचे जीवन-मरण हे वृत्तपत्रांना स्वातंत्र्य आहे की नाही यावर अवलंबून असते. वृत्तपत्र स्वातंत्र्य हा वृत्तपत्राचा आणि लोकशाहीचा आत्मा असतो. लोकशाहीवर आघात करावयाचा असेल तर राज्यकर्त्यांना प्रथम वृत्त स्वातंत्र्यावर आघात करावा लागतो वृत्तपत्रांना स्वातंत्र्य आणि विकास संवर्धनासाठी आवश्यकता आते ती पूरक-ओग्या वातावरणाची. 26 जून 1975 ला देशात प्रथम आणीबाणी लागू होताच वृत्तपत्रांची गळचेपी करण्यात आली. वृत्तपत्रांना स्वातंत्र्य आणीबाणी नंतर देण्यात आले परंतु या आणीबाणीचा विसार पडणे कोणासही अशक्य होते. यातूनच वृत्तपत्रांवर बंधनासाठी सरकार-सत्ता निर्बंधासाठी तयार असते. आणीबाणीची तरतूद असलेले राज्यघटनेतील कलम 352 हे शोभेसाठी नाही, देशाला अंतर्गत धोका उद्‌भवला या नावाखाली याचा वापर करण्यात सरकार तयार असते आणीबाणीचा वापर करणा-या कोणालाही सरकारशी वृत्तपत्र आणि पत्रकार यांचे संबंध जुळणे अशक्यच असते.[19] कारण वृत्तपत्राचा उद्देश सरकारचे गुणगान करणे एवढाच नसतो तर सरकारवर टीका आणि दोष दिग्दर्शन करणे आणि समाजाचे प्रतिबिंब दर्शविणे हा असतो. आणीबाणीच्या काळात याचा अभाव राहिला. वृत्तपत्रांची निष्ठा ही सर्वप्रथम वृत्तपत्र स्वातंत्र्याशीच असते. अविष्कार स्वातंत्र्य आणि इतर स्वातंत्र्याशीहि ती असते. शासनाच्या निर्णयाचे आणि योजनांचे स्वागत वृत्तपत्रांद्वारा करण्यात येते. मात्र हे निर्णय आणि योजना अहितकारक, दुर्गुण-दोषांना उत्तेजन देणा-या असतील तर वृत्तपत्र त्याचा विरोध करतात आणि केलाही पाहिजे. पंतप्रधान श्रीमती इंदिराजींनी लोकशाहीविरोधी धोरणाचा अवलंब करून सिक्कीम, जम्मू-काश्मीर येथील विरोधी पक्षांची सरकारे बहुमताने निवडून आलेली असताना पडली, आंध्रप्रदेशात सर्व विरोधक आणि बहुसंख्य जनता श्री.एन.ती. रामारावांच्या पाठीशी उभी राहील्याने तेथे सत्तांतर करता आले नाही.[20]

वृत्तपत्रांवर सेन्सोरशिप लादण्यापेक्षा स्वातंत्र्याच्या दुरुपयोगाची शक्यता व त्यातील धोके लक्षात घेता मी मुक्त-स्वातंत्र्य वृत्तपत्रांचाच पुरस्कार करेन असे पं. नेहरू मानत असत. मात्र त्यांच्या कन्येनेच त्यांची ही भूमिका दुर्लक्षित केली. सेन्सॉरशीपाची अंमलबजावणी करण्यासाठी काही ठिकाणी पोलीस अधिकारी, काही ठिकाणी माहितीखात्यातील अधिकारी व काही ठिकाणी



Scanned by CamScanner

पत्रकारांचीच नेमणूक करण्यात आली. त्यांच्याद्वारा शासनाला आक्षेपार्ह्य मजकूर रद्द करण्यात येत असे, स्वातंत्र्याच्या काळात प्रेरणा देणारी वाक्य, घोषणा, सुंदर भाषणे, परिच्छेद ही सेन्सॉरच्या नावाखाली रद्द झाली. यामुळे आजही वृत्तपत्रांना आणीबाणीच्या काळातील दिवस काळे दिवस वाटतात.[21] आणीबाणीच्या काळातील कटुतेबद्दल पोतदार ए.के. नोंदवितात की वृत्तपत्र स्वातंत्र्यावर आणीबाणी हा आघातच होता. त्याकाळामध्ये स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी आम्हाला ज्या तत्वांनी व आदर्शांनी प्रेरणा दिली त्या उदांत्त तत्वांचा आणि आदर्शांचा साधा उल्लेख करणे देखील पाप होऊन बसले होते.[22] भाषण-लिखाण प्रसिद्धी स्वातंत्र्याचा अनिर्बंध हक्क फक्त अमेरिकेतच आढळतो. देशद्रोही व्यक्तीसुद्धा अमेरिकेत पुस्तक लिहू शकते प्रसिद्ध करू शकते.न्यायालयही यावर बंदी घालत नाहीं मुक्त स्वातंत्र्याचे हे अमेरिकन उदाहरण आणीबाणीच्या काळातील सेन्सॉरशीपच्या नावाने बंदिवासात गेलेल्या वृत्तपत्रांना केवळ नावेच उदाहरणा दाखल राहिले.

आणीबाणीच्या काळात सेन्सॉरशीपच्या सर्वाधिक त्रास 'इंडियन एक्स्प्रेसच्या' रामनाथ गोयंका यांना झाला. सरकारी अवकृपामुळे संपादक एस. मूळगांवकर यांना संपादक पदावरून दूर व्हावे लागले. जो एकांच्या हातून एक्स्प्रेसचे संचालकपद जाऊन के.के.बिर्ला यांची मालकी आली. आणीबाणीच्या विरोधी मोहिमेचे मुखपत्र आणीबाणी काळात एक्स्प्रेसस होते आणिबाणी नंतर जनता पक्षाच्या कार्यास एक्स्प्रेसने महत्व दिले.जनता सरकारच्या मंत्रिमंडळातील मतभेद चव्हाट्यावर येऊ लागताच रामनाथ गोयंका आणि एक्स्प्रेस ग्रुप व्यथित होता.[23] आणीबाणी काळात वृत्तपत्रांवर नेमलेल्या सरकारी अधिका-यांमार्फत सेन्सॉरशीपा बद्दलची सूचना-निवेदन कोणासही मिळाले नाही देण्यात आले नाही.

मराठवाड्यातून औरंगाबाद येथून प्रकाशित आ.कृ.वाघमारे यांनी काढलेले वृत्तपत्र दै. मराठवाडात संपादक अनंत भालेराव यांनी 26 सप्टेंबर 1975 ला फॅसीस्ट बनून फॅसिझमचा मुकाबला करता येईल का? असा अग्रलेख लिहिला या अग्रलेखात लिहिले की मोरारजी आणि जे.पी. यांच्याविषयी एक विधान असे की या नेत्यांनी जी भूमिका घेतली व ज्यांना त्यांनी जवळ केले ते लक्षात घेतले तर त्यांनाच गोळ्या घालायला पाहिजेत. परंतु आम्ही त्यांना डाक बंगल्यात आरामशीर ठेवले आहे. राजकीय कारणांसाठी ज्यांना अटक करण्यात येते त्यांना योग्य मानमरातबाने वागविणे हा सर्वत्र शिरस्ता आहे.इंग्रज आपल्या देशावर राज्य करीत होते तेंव्हा म.गांधीजी, पंडितजी, सरदार, मौलाना, जयप्रकाश यांना अनेकदा अटक झाली.इंग्रज साम्राज्यवादी होते तरी त्यांनी आपल्या या नेत्यांना आत्ताच्या पेक्षाही अधिक आरामात ठेवले होते.गांधीजी-कस्तुरबा आणि महदेवभाई यांना तर पुण्याला आगाखान पॅलेसमध्ये ठेवण्यात आले होते. राजकीय नेते म्हणून त्यांना सर्व सोयी देखिल पुरविण्यात येत असत. तेव्हा केवळ एवढ्यावरून इंग्रजांना आपण लोकशाहीवादी मानले नाही. विरोधकांना योग्य त्या आदराने वागविण्याचा भाग अर्थातच सामान्य सभ्यतेचा व सुसंकृतपणाचा आहे. तेव्हा विरोधकांना आपण डाकबंगल्यात ठेवतो म्हणून आपण लोकशाहीवादी आहोत असे समजून लोकशाहीनिष्ठांची कृपा करून सवंग करू नका आपल्या देशातील थोर पुरुषांनी देशांसाठी त्याग केला कष्ट सोसले उभी हयात व्रतस्थापणे लोकांच्या सेवेत वेचली



Scanned by CamScanner

त्यांच्याविषयी केवळ मतभेद आहेत म्हणून वाटेल ते विधाने करणे अथवा त्यांना हलके लेखणे लोकशाहीपेक्षा फ्यासीस्ट मनोवृत्तीचेच द्योतक आहे असे मराठवाडा अग्रलेखातून नोंदवितो.[25]

आणीबाणीच्या काळात सेन्सॉरशिपच्या आधारे महाराष्ट्र सरकारने प्रसिद्धीपूर्व तपासणीचा कायदा लागू करताना म्हटले की 'सार्वजनिक सुरक्षा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी म्हणून महाराष्ट्र सरकार नियतकालिक, पत्रके किंवा इतर साहित्य यांचे संपादक आणि सर्व मुद्रक आणि प्रकाशक यांना असा आदेश देत आहे की प्रकाशनासाठी योजलेले सर्व साहित्य त्यांनी प्रकाशनपूर्व तपासणीसाठी नियोजित सेन्सॉर अधिकाऱ्याना सदर करावे.[26] प्रसिद्धीपूर्व तपासणीसाठी अधिकारी नेमले. प्रत्यक्ष तपासणीचे काम करणा-या अधिका-यांच्या लहरीला त्यामुळे अधिक वाव मिळाला कारण त्या अधिकार्यांना वृत्तपत्राच्या कामाचा बिलकुल अनुभव आणि माहिती नव्हती नांदेडच्या 'प्रजावाणी' नागपूरच्या 'मासेस' रत्नागिरीचे 'सनातन' धुळ्याचे 'स्वातंत्र्यकारण' इ.ना आणीबाणीच्या सेन्सॉरशिपाचा त्रास सहन करावा लागला. धुळ्याच्या 'स्वातंत्र्यकारण' वृत्तपत्रात संपादक कांतीलाल गुजराथी यांनी 1942 च्या चळवळीत नंदुरबार मध्ये शहीद झालेला शिरीषकुमार या विरबालकाच्या मृतदेहाची छायाचित्रे दि. 02 सप्टें. 1975 च्या अंकात छापली. त्याखाली 'लिहिलेले होते' या आहुती निर्भायतेच्या प्रेरणा देतात. या आर्त हकेस्तवच स्वातंत्र्य भारतावर बंदी घालण्यात आली.[27]

आणीबाणीच्या काळात शासनविरोध करणा-या सिंधुदुर्गातील 'व्याध' 'महाराष्ट्र टाइम्स' 'तरुण भारत' युग-धर्म हिंदी, इत्यादी वृत्तपत्रांना सेन्सॉरशिपचा त्रास झाला. महाराष्ट्रात सर्वाधिक त्रास साने गुरुजींच्या 'साधना' साप्ताहिकाला झाला. अनंत भालेरावांच्या दै.मराठवाडा वृत्तपत्राचाही छळ करण्यात आला. वृत्तपत्राला जाहिरातीच देवू नयेत असे शासकीय परिपत्रक स्वायत्त महामंडळे, निमसरकारी संस्था सहकारी बँका, नगरपालिका, विद्यापीठे, शिक्षण संस्था, महाविद्यालये तसेच साखर कारखाने यांना पाठविण्यात आले.[28] सोलापूरच्या संचाराचे संपादक श्री. रंग वैद्य यांनी नांदेडच्या प्र्जावानीच्या वर्धापनदिन कार्यक्रमात वृत्तपत्र स्वातंत्र्याची शासनाने मुस्कटदाबी केली तर समाजाच्या प्रगतीला मारक ठरते. असे स्पष्ट केले. हे एका संपादकाचे मत कोणत्याही वृत्तपत्रातून प्रकाशित करता आले नाही अथवा झाले नाही. महाराष्ट्र टाइम्सवर हि आणिबनीच्या काळात निर्बंध आले. अग्रलेख छापता आले नाहीत तसेच अग्रलेखाच्या जागा रिक्त सोडून वृत्तपत्रांची छपाई झाली. साप्ताहिक साधनाने साधना ट्रस्ट माध्यमातून नायालयात लढा वकील सी.आर.दळवी मार्फत दिला साधनाचे अकरा अंक जप्त करण्यात आले. एक हजार रुपयाचा जामीन हि देण्यात आला. साधनाने न्यायिक लढा लढला.न्या. तुलाजापुरकर आणि न्या. गाडगीळ यांच्यापुढे खटला चालला. अंततः साधना विजयी ठरला.[29] साने गुरुजींचे विचार कविवर्य मंगेश पाडगावकरांच्या कविता डॉ. ना.तू.हर्डीकरांचे विचार, नानासाहेब गोरेंचे लिखाण खा.पुरुषोत्तम मावळणकरांचे मनोगत, गुजराथचे कवी उमा शंकर जोशी, ख. कृष्णकांत, एस.एम.जोशी, जयप्रकाश नारायणांचे संदेश, मराठी साहित्य संमेलनाच्या भाषणात इंदुमती केळकर यांनी कराड मध्ये दिलेल्या घोषणा साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष दुर्गा भागवत यांचे करडे रास्थ्र, वी.दा.करंदीकरांचे काव्य, वसंत बापटांचे विचार, मृणाल गोरे यांची अटक आणि तुरुंगातील घटना मधु दंडवते, मोहन धारी यांचे विचार साधनाने वंदिवासाच्या सात महिन्याच्या काळात प्रकाशित केले. 06 जाने.1976 ला मराठी पत्रकार दिन



Scanned by CamScanner

साधनात पाळण्यात आला. संपादक यदुनाथ थत्ते यांनी पत्रकारितेचे महत्व, स्वातंत्र आंदोलनातील पत्रकारांची भूमिका त्यांनी विषद केली. ब्रिटीश सरकारचे बसविलेली आणीबाणी सध्याच्या स्वदेशी सरकारने बसविलेल्या आणीबाणीपेक्षा कमी दहशतीची होती ब्रिटिशांना भारतीयांची भीती वाटत होती. त्याप्रमाणे साकीय सरकारला स्वतःच्या नागरिकांचीच भीती आज वाटते अशी शंका त्यांनी व्यक्त केली. त्रास साधनाने प्रसिद्धी दिली.[31]

दि. 26 जुन 1976 ला आणीबाणीला एक वर्ष पूर्ण झाले. साधनाने धैर्याने शासनाविरुद्ध लढा दिला. ओपिनियन, जनता, फ्रिडमफर्स्ट्, भूमिपुत्र, साधना, मराठवाडा, स्वतंत्र भारत,समानता, जनवाणी, राष्ट्रसेवक, विकास, माणूस इत्यादी. वृत्तपत्रांनी आणीबाणीत धैर्याने पावले टाकली. यासाठी पशान्साही साधनाने केली. वृत्तपत्रांवरील बंदी बरोबरच पत्रकार-संपादक यांना बंदिवास स्वीकारावा लागला. साधनांमध्ये समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांनी आणीबाणीचा ताळेबंद[32] हा लेख लिहून आणीबाणीच्या काळातील घटनांचा-कार्यांचा वस्तुनिष्ठ लेखाजोखा मांडला. आणीबाणी लागू होताच साधनावर शासनाचा कटाक्ष राहिला. साधनांवर बंदी घालण्यात आली. साधनाचे आणीबाणीच्या काळात यदुनाथ थत्ते संपादक होते. साधनाने आणीबाणीच्या काळात दिलेला लढा, न्यायालयीन संघर्ष यांचे वर्णन साधनाचे माही संपादक सदानंद वरदे यांनी 'दुस-या स्वातंत्र्य युद्धातील साधनांचा लढा' असा केला आहे. मराठी वृत्तपत्र सृष्टीला लोकमान्य टिळक, डॉ. गो.ग. आगरकर यांचा निर्भायातेचा वारसा पत्रकारितेचा जाज्वल अभिमान सांगणारा, नेतृत्वाचा वारसा आहे पण केसरीने हा वारसा दुस-या स्वातंत्र्य लढ्यात नेतृत्व स्वरुपात करावयास हवा होता पण तो केसरीने केला नाही, हा वारसा साने गुरुजींच्या साधनाने केला, तोच वारसा आ.कृ. वाघमारेंच्या दै. मराठवाड्यानेही पाळला[33] साधनाने आणीबाणीच्या काळात साधनाने संपादकांनी आपण विश्वास साधना ट्रस्टच्या मालमत्तेची की आपण साने गुरुजींच्या विचारांचे विश्वस्त आहोत? यात साने गुरुजींच्या विचारांचा- ध्येयाचा मार्ग स्वीकारला, मालमत्ता हि त्या ध्येयवादाचे फक्त आणि फक्त साधन आहे असे साधनाने मानले आणि आजही तोच विचार साधनाने जोपासला आहे. साधनाचा पाया लोकशाही समाजवाद राहिला साने गुरुजींचा विचार भारतात रक्तपात न होता समाजवाद येवो, हा होता. व्यक्ती स्वातंत्र्यासह समाजवाद फुलो हि त्यांची भूमिका होती. आणीबाणीत बंधनामुळे वृत्तपत्र स्वातंत्र्य राहिल्याने पायदळी तुडविण्यात आली. आणीबाणी काळात साधना अंतर्धान झाला मात्र आणीबाणीनंतर साधना फिनिक्स पक्षाप्रमाणे उभारला. आणीबाणीच्या काळात साधनाने शासनावर टीका करताना अच्युतराव पटवर्धनांचा सल्ला आणि मार्ग मानला. आणीबाणीचा प्रतिकार सौम्यात्तम करा, नंतर सौम्यात्तर करा, तद्नंतर सौम्य करा आणि नंतर प्रखर करा, पण निषेध नोंदवाच याचाच भाग म्हणून पहिल्या अंकाचे काव्हरपेज black छापण्यात आले तरी साधनावर बंदी घालण्यात आली.पुढील अंकाची उत्सुकता होती.साधनाचा वाचक वर्ग आणिबाणीच्या काळात वाढला. साधना वाचल्याने आपण आपली स्वातंत्र्यकांक्षा निर्भयपणे जतन करतो असा वाचकांना व संपादकांनाही अनुभव येत होता.[34] साधना हातात केव्हा पडतो-पडेल अशी आशा बाळगणारा वाचक वर्ग हि साधनाचा होता. अच्युतराव पात्वार्धनान्प्रमाणे नानासाहेब गोरेंनी 'साधनावरील बंदी हि आपल्यासाठी नाहीच असे धरून चालावे' असे स्पष्ट केले होते.[35]



Scanned by CamScanner

साधनाचे एकूण अकरा अंक आणीबाणीच्या काळात आक्षेपार्ह्य ठरले. तरी साधनाने आपले प्रकाशन बंद केले नाही. सदनांवर एक हजार रुपयाचा जमण लावण्यात आला होता तो वाचकांनी एक एक रुपया करून जमा केला महत्वपूर्ण हे की एक रुपया साधनाकडे पाठविण्यासाठी मनीऑर्डर करिता वाचकांनी 30 पैसे खर्च केले, करावे लागले एकूण चार हजार रुपये संकलित झाले. या बंदी काळात साधना विना शीर्षक-विना चित्र छापण्यात येत असे, त्यामुळे साधनाच्या अनेक अंकावर बंदी घालता आली नाही, साधनाने आणीबाणीच्या काळात बंदिवासातील कैद्यांचे लेख प्रकाशित केले.[36] आणीबाणी जाहीर केल्यानंतर पहिले काही दिवस पंतप्रधान इंदिराजी आपल्याच निवासस्थानी सल्लागारांबरोबर असत. इंदिराजी आणि संजय गांधी यांची अधिकारशाही वाढतच गेली.वृत्तपत्रांवर पूर्वपरवानगीची अट टाकण्यात आली.सर्वत्र असुरक्षितता वाटत होती, एक अनामिक भय सर्वत्र पसरलेले होते असे के.पी. माथुर नमूद करतात.[37] मात्र आणीबाणीच्या काळात काही गोष्टी साध्य करण्यात आल्या.निर्णय त्वरित अंमलात येत रेल्वे वेळापत्रक वेळेवर अंमलात येवू लागली स्वच्छता आणि पोलीसांचे कार्य कार्यक्षम बनले, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि सेवांमध्ये तत्परता आली.[38]

आणीबाणीच्या काळात शासनामार्फत कोणत्याही जाहिराती देण्यात आल्या नाहीत. वृत्तपत्रावर सेन्सॉरशीप लावण्यात आली. आणीबाणी लागू करताना आणीबाणीचा खरा-खुरा लाभ विषद करणारा प्रसार मोठ्या प्रमाणात करण्यात आला. आणीबाणी वरदान आहे हा आभास निर्माण करण्यास आला. जेष्ठ विधीतज्ञ नानिपालखीवाला नमूद करतात की, 'कायद्याचे राज्य धुडकावून ज्यांची आपला फायदा करून घेतला त्यांना पुन्हा या अपयशाचे बळी व्हावे लागू नये हाच आणीबाणी उठविण्यामागचा मुख्य उदेश होता.[39] आणीबाणीच्या काळात पंतप्रधानांनी आपल्याला लोकशाहीमध्ये पूर्ण स्वातंत्र्य असल्याचं वक्तव्य दिले यास मात्र प्रसिध्दी वृत्तपत्रांनी दिली मात्र सद्यपरिस्थितीत सेन्सॉशीपचा पुरस्कार त्यांनी केला.देश विदेशातील वृत्तपत्र आणीबाणीवर टीका टिपणी करीत होती यात लंडनच्या इकोनोमिस्ट आणि न्यू स्टेटमेटचं कार्य श्रेष्ठ होतं, याबाबत बी. एन.टंडन लिहितात की, या आठवड्यात बाह्य वृतपत्राचे अंक आले नाहीत.गेली वीस वर्ष मी या नियतकालीकाचा नियमित वाचक आहे. आज काल देश-विदेशातील हवी ती नियतकालिक वाचण्याचा देखील स्वातंत्र्य उरलेले नाही.मन आणि मेंदूची उपासमार होणार का ? आपलं तर आयुष्य गेलं आपल्या मुलांना सेन्सॉर केलेली नियत कालीक वाचावी लावणार काम[40] असा खेद त्यांनी नमूद केला.लंडनहून प्रकाशित होणाऱ्या गार्डियन वृत्तपत्रात जेम्स कॅमरून यांच्या पत्नी (भारतीय) यांनी indiagoes tosleep (भारत झोपी गेला) असा लेख लिहला. यालेखाचा आशय स्पष्ट होता की, 14 -15 ऑगस्टच्या मध्यरात्री 1947 ला पं. जवाहरलाल नेहरुच प्रसिध्द वाक्य होत, 'जेव्हा अवघी दुनिया निद्रिस्त आहे तेव्हा भारत जागा होत आहे.' व 21 जून 1975 ला परिस्थिती अशी होती की, आज भारत देश पुन्हा झोपी गेला आहे, केव्हा जागा होईल, कोन जाग करेल, कोण जाणे, अशी परिस्थिती होती.[41] वृत्तपत्राबरोबरच आकाशवाणी हे पेसार माध्यमाचे सर्वात प्रभावी माध्यम होते. इंदिराजींनी विदयाचरण शुक्ल यांच्याकडे म्हणूनच माहिती व प्रसारण खात्याचा कारभार आणीबाणी काळात दिला.



Scanned by CamScanner

आणीबाणी काळात सेन्सॉरशीप वृत्तपत्रांवर लागू करताना भारत संरक्षण कायद्याखालील नियम 48 नुसार सेन्सॉशीप लागू करण्यात आली. माहिती व प्रसारण मंत्री महोदयांनी india Express आणि statesmen या वृत्तपत्रावर बंदी घालण्याचा आटोकाट प्रयत्न ही केला .मेनस्ट्रीम, हिम्मत ओपिनियन, सेमिनार सारखी मर्यादितखपाच्या वृत्तपत्रांवर ही बंदी घालण्यात आली. वृत्तपत्रात छापायाचे काम नाही? या संबंधी निर्बध लादले, नियम लादले. प्रत्येक वृत्तपत्राच्या कचेरीत पोलीस इन्स्पेक्टर येत असे. पृष्ठ-संख्यावर, वृत्त (छापण्यावर) बंधने आली, वृत्तपत्रांना होणारा कागद पुरवठा 1972-73 च्या काळात दुष्काळ व जनआंदोलन यास वृत्तपत्र अधिक महत्व देत असताना मर्यादित करण्यात आला होता त्याप्रमाणे मर्यादित करण्यात आला 'मदरल्यँड ऑर्गनाइझ ार' या वृत्तपत्रवर बंदी आली. ही दोन वृत्तपत्रे शासनावर-इंदिराजी व संजयवर टीका करण्यात अग्रसेर होती.[42] आणीबाणीच्याच काळात प्रेसट्रस्ट ऑफ इंडिया (पीटीआय), युनाटेड न्यूज ऑफ इंडिया (यु एन आय), समाचार भारती (एस बी), हिदुस्तान समाचार (एच एस) या चार संस्थांचे एककीकरण करण्यात आले.[43]

आणीबाणीच्या काळात शासनावर टीका करणारे वृत्तपत्र 'इंडियन एक्सप्रेस' होते. म्हणुनच एक्सप्रेसला दिला जाणाऱ्या जाहिराती शासनाने बंद केला. रामनाय गोंएका आणि भगवानदास गोएका विश्वस्त यांच्या समोर अडचणी उभ्या करण्यात आल्या. संपादकांना अटक करण्यात आली, सैंन्सॉर लावण्यात आले त्यामुळे खप कमी झाला. एक्सप्रेस कर्जबाजारी बनला.[44] आणीबाणीची घोषणा होताच दिल्लीच्या बहादुरशहा जफर मार्गावरून प्रसिध्द होणाऱ्या राष्ट्रीय वृत्तपत्राच्या कमी कण्याचा विस्तुत पुरवठा मध्यरामीच कापण्यात आल्याने जूनच्या सकाळी वाचकाच्या हातात पडणारी वृत्तपत्रे निघूच शकली नाहीत. आणीबाणीची सर्वात प्रथम बातमी बीबीसीने दिली.साधना साप्ताहिकावर 2 जुलै 1976 ला बंदी घालण्यात आली.स्वातंत्र, समता, न्याय आणि माणुसकी यांची प्रतारणा होताच वाचकांची वैचारिक घुसळण करण्याचे काम साधना साप्ताहिक कुंटूब यातील मधुवावाणी यांनी कर्तव्य नावाने साप्ताहिक करून केले. आणीबाणीचा वटहुकूम ज्या गतीने काढ्ण्यात आला त्याच आकस्मितपणे आणीबाणी रद्द करण्यात आल्याचा हुकुमाने 18 जाने 1977 ला पाचवी लोकसभा बरखास्त करीत असल्याचे घोषीत केले. आणीबाणी घोषीत करताच वृत्तपत्रे यांच्या वरील बंधने, बंध मुक्त करण्यात आले.निवडणुकीची घोषणा करताच तर्क वितर्क करण्यात आले. वृत्तपत्रांना स्वांतत्र्य प्रदान करून कमी कालावधीत निवडणुका घेण्याचे जाहीर करण्यात आले. आता स्वतंत्र आणि निर्भय वातावरणाची आवश्यकता होती.आणीबाणीच्या काळात वृत्तपत्र स्वतंत्रवर निर्बध असल्याने इंदिराजींनी स्वःपक्षातील खुरामस्करे व शासकीय अधिकारी यांच्या कडून मिळणाऱ्या माहितीवर अवलंबून राहिल्या. भाटगिरी,खुशमस्कऱ्या, शासकीय अधिकऱ्यांची स्तुतीस्तुमने करण्यापेक्षा गुत्पचर विभाजाच्या अहवालावार त्यांनी विश्वास ठेवला. समाजाचे प्रतिबिंब दर्शविणारे वृत्तपत्र आनिबानीच्या “ या काळात मुक्त नसल्याने वृत्तपत्रातून दृष्टिगोचर होणारा मानस पंतप्रधान इंदिराजीच्यासाठी पूरक राहिला नाही, जाणता आला नाही रायबरेलीच्या सार्वजनिक लोकसभेच्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला लोकशाही मार्गाने देशात एकतंत्री आणीबाणीच्या कालखंडाची शांततापूर्ण मार्गाने सत्तांतरक्रांती घडून आली. आणीबाणी पर्वाची इतिश्री झाली.



Scanned by CamScanner

**संदर्भ:**


1) माथुर, के.पी.गोडबोले सुजाता (अनु), दृष्टीआडच्या इंदिरागंधी- त्यांच्या वैधकीय चिकित्सकाच्या नजरेतून, पुणे -30, पहिली आवृत्ती, मार्च2017 पृ. 85.
2) वाळींबे, वी.स, इंदिरागांधी: बंगलोर ते रायबरेली, अभिजित प्रकाशन, पुणे, चत्वूर्यावृत्ती, जून 2012, पृ. 262.
3) लेले. ए. के, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे 30, व्दितीयावृत्ती, 2004 पृ. 1101
4) शर्मा ओमप्रकाश, सर्वोदय ओर जयप्रकाश नारायण, राधा पबलीकेशन, नई दिल्ली, 1992 पृ. 118
5) कित्ता, पृ. 115-116
6) टंडन, बी. एन., (अशोक) जैन (अनु), पंतप्रधानाच्या कार्यालयातून चाहूल आणीबाणीची, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, डिसेंबर, 2003 पृ. 286
7) वाळिंबे, वी. स., पुर्वोवत, पृ.218
8) चंद्र बिपीन., मुखर्जी मृदुलाअन्य, आजादी के बाद का भारत 1947-2000, हिंदी मध्यम कार्यान्वय निदेशालय, प्रथम संस्करण, 2002 पृ. 334
9) प्रधान, ग. प्र, जाधव ए. ग, हिरक महोत्सवी निवडक साधना, खंड-8, वेध साधना पत्रकारितेचा, साधना प्रकाशन, पुणे, सप्टेबर.2007 पृ. 141
10) माथुर, के. पी, गोडबोले सुजाता (अनु), पुर्वोवत, पृ. 89.
11) कित्ता, पृ. 90.
12) कित्ता, पृ. 89
13) मेहदळे विश्वास, राष्ट्रपती, अनुबंध प्रकाशन, पुणे 43, प्रथमावृत्ती, 2014 पृ. 114
14) कित्ता, पृ. 115
15) टंडन बी. एन, जैन अशोक (अनु), पुर्वोवत, पृ. 291
16) चंद्र , बिपीन, मुखर्जी मृदुला, अन्य, पुर्वोवत, पृ. 341-345
17) जयकर पुपुल, जैन अशोक (अनु). इंदिरागांधी, राजहेस प्रकाशन, पुणे 30, आवृत्ती सोळावी, सप्टेबर 2016 पृ. 242-43
18) टंडन बी. एन, (अशोक जैन अनु), पुर्वोवत., पृ. 315
19) पोतदार के. ए, संपादक आणि संपादकीय, कोस्तुभ प्रकाशन, नागपूर 22, प्रथमावृत्ती, 1991 पृ. 152-153.
20) कित्ता, पृ. 154-155
21) कित्ता, पृ. 158
22) कित्ता, पृ. 158
23) तळवलकर गोविंद, वैचारिक व्यासपीठ, साधना प्रकारान, पुणे, प्रथमावृत्ती, मार्च 2012, पृ. 132-133




Scanned by CamScanner

24) भालेराव अनंत, आलो याची कारणासी, श्रीविआ प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर 1985, पृ. 98-99
25) है. मराठवाडा, अग्रलेख, दि: 26- सप्टेंबर 1975, पृ. 2
26) लेले, ए. के. पुर्वोवत. पृ. 1103
27) कित्ता, पृ. 1107
28) कित्ता, पृ. 1206
29) कित्ता, पृ. 1109-1110
30) प्रधान ग. प्र,रा.ग.जाधव, पुर्वोवत, पृ. 150
31) कित्ता, पृ. 153
32) कित्ता, पृ. 116
33) प्रधान, ग.प्र, जाधव ए.ग, पूर्वोवत, खंड- 105, राजकीय व आर्थिक, पृ. 12
34) कित्ता, पृ. 15
35) कित्ता, पृ. 15
36) कित्ता, पृ. 16
37) माधुर, के.पी.सुजाता गोडबोले (अनु), पुर्वोवत, पृ. 92
38) कित्ता, पृ. 92
39) पालखीवाला, नाणी एस, वाळिंबे. वी.स.{ अनु}, कई- दि पिपल, भारत विराट लोकशाही, मेहता प्रकाशन, पुणे-30, सप्टेंबर 1998 पृ. 37
40) टंडन बी. एन, पुर्वोवत, पृ. 313-314
41) कित्ता, पृ. 300-301
42) वाळिंबे, वी. स. इंदिरागांधी- बॅंगलोर ते रायबरेली अभिजित प्रकाशन चतूर्थावृत्ती, जून 2012, पृ. 220
43) कित्ता, पृ. 233
44) कित्ता, पृ. 246-248
45) प्रधान, ग. प्र, जाधव ए. ग, पुर्वोवत, खंड-8, पृ. 142-172.
46) धर, पी. एन, जैन अशोक (अनु), इंदिरागांधी आणीबाणी व भारतीय लोकशाही, रोहन प्रकाशन, पुणे, (4 थी ) आवृत्ती, फेब्रुवारी 2012, पृ. 270-272



Scanned by CamScanner